# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि/म.वि.वि./२०१८–१९ प्रवेशक्षमतावाढ/४१५ दिनांक ०९ जुलै, २०१८.

प्रती,

**प्राचार्य,**
**सर्व संलग्नित अव्यवसायिक महाविद्यालये,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

**विषय :– सत्र २०१८–१९ करिता मंजुर प्रवेश क्षमतेच्या २० टक्के जास्तीची प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी २०१८ च्या १२ वी च्या परिक्षेचा निकाल मोठया प्रमाणात लागलेला असल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहू नये याकरीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ज्या पदवीस्तरावरील **(UG)** अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने होत नाही अशा सर्व पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता मंजूर प्रवेश क्षमतेच्या २० टक्यांनी फक्त सत्र २०१८–१९ करीता वाढविण्याची बाब प्रस्तावीत आहे.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ज्या अभ्यासक्रमात मंजुर प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्षाचे प्रवेश पुर्ण झाल्यानंतर देखील विद्यार्थी प्रवेशासाठी प्रतिक्षा यादीत आहेत. अशा अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता मंजुर प्रवेश क्षमतेच्या २० % वाढवून देण्याकरिता विद्यापीठाकडे **दि. २० जुलै, २०१८ पर्यत** प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव सादर करतांना मंजुर प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्षातील पवेशित विद्यार्थ्यांची यादी आणि प्रतिक्षा यादीत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहील. **यापुर्वी ज्या महाविद्यालयांनी प्रवेश क्षमता वाढीकरिता प्रस्ताव सादर केला होता त्यांनी नव्याने प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.** अतिरीक्त प्रवेश क्षमता ही केवळ सन २०१८–१९ पुरतीच मर्यादीत राहील व या पोटी शिक्षकांचा कार्यभार वाढल्यास कोणताही आर्थिक भार शासनावर येणार नाही या अटीवर वाढीव क्षमतेपोटी कोणत्याही महाविद्यालयांना नवीन अतिरीक्त पद मंजूर केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

**आपला**

**(प्रदिप बिनीवाले)**
**उपकुलसचिव**
**(अति.कार्यभार)**